11-06-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 6/10/2025 10:23 PM Page 1




**BEFORE THE JOINT MAMLATDAR-III OF BARDEZ TALUKA MAPUSA, BARDEZ-GOA.**
**Mutation No: 214553.**
**City: Mapusa.**

1. SDJ Developers Private Limited through Director Devender Shokeen r/o H. No. 35(1)B Khalchavada, Arambol ....Applicant

V/s

1. Luizin Sauto alias Luisinha Perpitua Fernandes 2. John Dolphin Sequeira 3. Michelle Sequeira alias Michelle Isabel Lobo alias Michelle Dolphie Sequeira 4. Diana John Dolphie Sequeira alias Diana Sequeira alias Dim. Andreia 5. Delvin John Dolphie Sequeira alias Delvin Sequeira 6. Carlos Bartolomeo Zacarias Fernandes alias Zacarias Fernandes. ... Opponents

To all opponents /legal heirs/any other interested parties

**PUBLIC NOTICE**

Whereas the applicant SDJ Developers Private Limited through Director Devender Shokeen r/o H. No. 35(1)B Khalchavada, Arambol, has filed the application U/S 96 of Goa Land Revenue Code 1968 for Mutation in property bearing Chalta No. 76/19 PT Sheet No. 9 situated in Mapusa City Taluka Bardez Goa. Applicant has acquired the right over the property by virtue of Deed of Sale under registration no BRZ-1-645-2025 Book I document dated 30/01/2025 duly registered in the office of the Civil Registrar cum Sub Registrar Bardez Goa. Applicant has also submitted 1. order in inventory proceedings No. 109/2021/C/A dated 10/01/2022, 2. Deed of Sale/Conveyance dated 21/04/2008, and 3. Deed of Succession dated 18/02/2008. Therefore applicant requested to include the name of SDJ Developers Private Limited and Rahil Infra Buildtech Private Limited in Form D of above mentioned chalta no. and P.T. Sheet no., by deleting existing of John Dolphin Sequeira.

And whereas the notices in Form no. X were served to all the interested parties by registered A/D. However some A. D. card returned back with the Postal remarks "Party Expired/Party Left/Not Known/Address out of Station" and he do not known the detailed addresses of the Legal heirs and whereabouts of the interested parties.

And whereas the applicant has prayed vide his application for substitute service, by publication of public notice in any one daily newspaper as required under Order V Rule 20(1A) of C.P.C. as the applicants does not know the legal heirs and the address of the interested parties.

All the interested parties are hereby given notice of the said mutation entry and called upon to submit to me their objection if any to the mutation entry within 15 days from the date of publication of this notice failing which the suitable order under the provision of LRC shall be issued by the Certifying Officer.

**Place: Mapusa. Date: 09/06/2025.**
**Sd/- (Jenisa Pereira)**
**Joint Mamlatdar – III Bardez**
**Mapusa Goa** SEAL



**CHANGE OF NAME**

**I, Savio Khambatta, resident of House No.1378/A, Damon, Raia, South Goa, 403720, would like to change my name from Savio Rosi Khambatta to Savio Khambatta Hereinafter in all my future dealings and documents I would be known as Savio Khambatta**
**Sd/-**
**Savio Khambatta**



**IN THE COURT OF THE INSPECTOR OF SURVEY AND LAND RECORDS, CITY SURVEY MAPUSA, BARDEZ-GOA**
**Case No. ISLR/DEM/BAR/MAP/197/2021**

1. Shri. Gurudas J. Pandit
R/o Ansabhat. Mapusa. Bardez-Goa....Applicant

V/s

1. The Communidade of Mapusa, Through Administrator of Communidade Bardez, North Zone, Mapusa, Bardez-Goa.
2. The Administrator of Commmunidade, North Zone, Mapusa, Bardez-Goa.
3. Gopi Rama Usapka R/o chana Centre, Municipal Market, Mapusa-Goa.
4. Albertin D'Souza
5. Alberlina De Souza
6. Amelia Pinto

All R/o 3rd Morod, Bardez-Goa. ...Respondents

**PUBLIC NOTICE**

Whereas, the above named applicant has moved an application to this Court for Demarcation of HIS/HER/THEIR/ITS share under section 114 of Land Revenue Code 1968 in respect of property surveyed under Chalta No. 2/9 of P.T. Sheet No. 176 of Mapusa City of Bardez Taluka.

AND WHEREAS, applicant served the notices through Registered A.D to the adjoining holders.

AND WHEREAS, notices are returned back from the postal authority.

AND WHEREAS, the applicant has made an application on hearing dated 21/05/2025 and prayed for service of summons by issuing Public Notice in any local daily under order V Rule (20(1-A) of Civil Procedure Code, 1908 as the applicant has stated his inability to submit the detailed addresses of the above respondents and their legal heirs.

AND WHEREAS, I am satisfied that this is a fit case for grant of such permission.

NOW THEREFORE, notice is hereby given again to all the above opponents and all interested parties to appear on 12th June, 2025 at 11.00 a.m to file their say on the said date and time, failing which the matter will be heard and determined in their absence.

Given under my hand and seal of this court on 26th day May, 2025.

Sd/- **(Sandeep B. Chodankar)**
Inspector of Survey & Land Records, City Survey Mapusa-Goa.
SEAL


# माऊसवाडा पेडणेतील रस्ता कमकुवत

## रस्ता वाहतुकीसाठी बंद — धडा कोसळण्याची शक्यता

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. १०** : पेडणे पालिका क्षेत्रातील माऊस वाडा च्यारी यांच्या निवास स्थानावरील जवळील रस्त्याची कडा कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रस्ता ठिकठिकाणी खचल्यामुळे भविष्यात असाच प्रकार जर घडत राहिला तर, हा रस्ता पूर्णपणे वाहतुकीसाठी बंद होऊ शकतो.

माऊसवाडा वडाजवळ जो मुख्य रस्ता आहे. त्या ठिकाणी खालच्या बाजूला च्यारी यांची घरे आहेत. त्या घराच्या बाजूला अर्ध्या परिसरात संरक्षण भिंत उभारलेली आहे. तर



पेडणे : रस्ता माहिती देताना राजन कोरगावकर व स्थानिक.

दुसऱ्या बाजूनी संरक्षण भिंत नसल्यामुळे धडा कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ठीक ठिकाणी हा रस्ता खचत असल्याचे चित्र दिसून येते. सरकारने हा रस्ता अवजड वाहतुकीसाठी निर्बंध घालावेत, अशी मागणी स्थानिकानी केली आहे. जर अवजड वाहने वारंवार येत राहिली तर हा रस्ता पूर्णपणे कोसळून स्थानिकांना रस्ता धोकादायक ठरू शकतो. त्या नजरेतून सार्वजनिक बांधकाम खात्यात रस्ता विभागाने योग्य ती दखल घेऊन उपाययोजना करावी, अशी मागणी मिशन फॉर लोकलचे राजन कोरगावकर यांनी केली आहे.

मिशन फॉर लोकलचे राजन कोरगावकर यांनी या रस्त्याची पाहणी केली. त्यांनी बोलताना सांगितले या रस्त्याविषयी मिशन फॉर लोकलतर्फे पेडणे उपजिल्हाधिकाऱ्यांना पत्र देऊन हा रस्ता अवजड वाहतुकीस बंद करावा. अन्यथा या रस्त्यावरून अवजड वाहने जर वारंवार गेली तर रस्ता पूर्णपणे खचून जाऊ शकतो. धडा कोसळण्याची ही चिन्हे दिसू लागली आहे. तशा प्रकारचा निवेदन सादर करणार असल्याचे राजन कोरगावकर यांनी सांगितले.

स्थानिक नागरिक तुळशीदास कवठणकर यांनी हा रस्ता अवजड वाहनामुळे धोकादायक बनला आहे. ठिकठिकाणी रस्ता खचल्याचे चिन्ह दिसत असून धडाही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी केली आहे.


**CHANGE IN NAME**

I **JUSTINIANO DE BRAGANCA**, r/o H.NO.1149 SEGUNDO BAIRRO SANTA CRUZ TISWADI, PIN:403005, Goa, like to change my name from **JUSTINIANO BRAGANZA** to **JUSTINIANO DE BRAGANCA** Hereafter in all my dealings and documents I will be known by the name **JUSTINIANO DE BRAGANCA.**


# पाडलोस येथे कालव्याचा भाग खचला

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**बांदा दि. १०** : मडुरा पाडलोस हद्दीवरील पाडलोस भागात असलेल्या तिलारी पाटबंधारे विभागाच्या कालव्याचा भाग खचू लागला आहे. कालव्यापासून शेतकऱ्यांची जमीन केवळ दोन ते तीन मीटर अंतरावर असल्याने

### ▶ संरक्षक भिंत बांधण्याची मागणी

शेतकऱ्यांची जमीन कालव्यात जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे. नुकसान होण्यापूर्वीच पाटबंधारे विभागाने कालव्याच्या दोन्ही बाजूने संरक्षक भिंत बांधण्याची मागणी, पाडलोस येथील काजू बागायतदार शेतकरी सुधीर गावडे यांनी केली आहे.

दमदार कोसळलेल्या मान्सूनपूर्व पावसाने अनेक ठिकाणी नुकसान झाले. काही ठिकाणी तर रस्त्याच्या बाजूलाच मोठमोठाली भगदाडे पडली. तर पाडलोस व मडुरा सीमाभागात असलेल्या तिलारी पाटबंधारे कालव्याचे पात्र दिवसेंदिवस रुंदावत चालले आहे. नुकत्याच झालेल्या पावसामुळे तीन ते चार मीटर जमीन कालव्यात कोसळली. कालव्यापासून शेतकऱ्यांची जमीन दोन ते तीन मीटर अंतरावर असल्याने भविष्यात काजू बागायती कालव्यात कोसळू शकतात. त्यामुळे अधिकाऱ्यांनी याकडे लक्ष देत कालव्याच्या दोन्ही बाजूला संरक्षक भिंत बांधण्याची मागणी बागायतदार सुधीर गावडे यांनी केली आहे.

बागायतीपासून सुमारे दोन मीटर अंतरावर कालवा खचत असल्याने मेहनत करून लागवड केलेल्या काजू कलमांचे नुकसान होण्याची शक्यता आहे. संपूर्ण पावसाळा अजून बाकी असल्यामुळे अजून किती जमीन खचणार अशी भीती शेतकऱ्यांत निर्माण झाली आहे. तसेच नुकसान झाल्यास बागायतीचे पुढे काय असा सवाल सुधीर गावडे यांनी केला आहे.


**Office of the Civil Registrar-Cum-Sub Registrar, Mormugao, Goa.**
Shop No. 1 & 2, Karma Empress Building, Ground Floor, Near KTC Bustand, Vasco da Gama, Goa.
Telephone No.9405864461

No. CR/SR/MOR/ /2025 Dated:26/05/2025

**Office of the Civil Registrar-Cum-Sub Registrar and Special Notary Shri. Tushan Gurudas Kunkolienkar, Civil Registrar-Cum-Sub Registrar and Special Notary in the said Judicial Division.**

In accordance with the section 346(11) of "The Goa Succession Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012", it is hereby made public that by a **Deed of Qualification of Heirs** dated 23/05/2025, drawn by and before me Shri. Tushan Gurudas Kunkolienkar, **Civil Registrar-Cum-Sub Registrar and Special Notary, Mormugao at Vasco-da-Gama, at pages 143 to 146 of Notarial Book No. 204 of this office**, the following is recorded:

That Mr. Shantanu Narayan Desai, died on 24/06/2024, at Chicalim Goa, intestate without any will or any gift or any other testamentary disposition of his last wish but leaving behind his widow Smt. KIran Vithal Navelcar changed to Kiran Shantanu Desai, as his moiety sharer and his two sons, namely, (one) Vineet Shantanu Desai married to Rhea Ajit Kamat changed to Rhea Vineet Desai and (two) Ankit Shantanu Desai married to Karishma S. Keni changed to Karishma Ankit Desai, as his "Sole and Universal heirs". And besides them, there being no one else in terms of law of succession still in force in this state of Goa who may prefer or concur along with them to the inheritance left by the said deceased person.

**Any person having objection to this deed may file their objection in this office within one month from the date of its publication.**

Place: Mormugao-Goa.
Dated: 26/05/2025 Sd/-
Seal **(Tushan Gurudas Kunkolienkar)**
Special Notary, Mormugao.

*Sandeep Ads*



**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR CUM SUB REGISTRAR AND SPECIAL NOTARY (EX- OFFICIO) OF TISWADI JUDICIAL DIVISION AT PANAJI, GOA**
NO.CRSR/TISWADI/NOT/478/2025
Dated: 09/06/2025

**NOTICE**

Shri. Manuel Vales, Civil Registrar cum Sub Registrar and Special Notary (Ex-Officio) of Tiswadi Judicial Division at Panaji-Goa.

In accordance with the Section **346 (11) of "The Goa Succession Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012,"** it is hereby made public that by a Notarial Deed of Succession dated 03rd June, 2025 recorded before me in Book No 769 of Notarial deeds at page 63 onwards the following is noted:-

**That on Fifth November, Two Thousand and Twenty Four (05/11/2024) at Ribandar Panjim Goa, Died, Fabian Jesus Tavares also known as Fabiano Jesus Tavares, son of late Paulo Joaquim Jose Estevao Da Conceicao Tavares or Paulo Tavares and of Cira Carmina Anes. Age 72 years, resident of House No 365, Near Ajuda Church Ribandar, Goa. That the said Fabian Jesus Tavares also known as Fabiano Jesus Tavares was married to Maria De Fatima Piedade Rosario Dias, who after marriage is known as Maria De Fatima Dias Tavares or Maria De Fatima Tavares in their first and only one nuptial without any prenuptial agreement who died intestate without any will or Gift or any othe testamentary disposition. The declarants state that the deceased person has left behind the following legal heirs (1) his wife Cum Half sharer namely Maria De Fatima Dias Tavares or Maria De Fatima Tavares before marriage known as Maria De Fatima Piedade Rosario Dias (interested party) and their two male children /two sons Namely (1) Mr. Farron Nigel Tavares, son of Fabiano or Fabian Jesus Tavares and of Maria de Fatima Piedade Rosario Dias e Tavares, age 40 years, married, service, resident of House No 365, Near Ajuda church, Ribandar, Goa and (2) Mr. Floyd Einstein Tavares, son of Fabiano or Fabian Jesus Tavares and of Maria De Fatima Piedade Rosario Dias e Tavares, age 37 years, married, service, resident of H.No 365, Near Ajuda Church, Ribandar, Goa as his sole and universal heirs/Successors to the estate the declarants further state that besides these above universal legal heirs, there does not exist any other person or persons who accoding to law could prefer or concur or have better claim to the estate left by the said deceased person namely Fabian Jesus Tavares or Fabiano Jesus Tavares And besides** that there does not exist any other person or persons who according to the prevailing law in force in the State of Goa may have a legal right of Succession or would prefer in the said succession or would concur to the inheritance left behind by said deceased persons.

Any person having objection to this deed, may file in this Office within one month from the date of its publication.

Sd/- **(Manuel Vales)**
Special Notary (Ex-Officio),
Tiswadi, Panaji- Goa
CIVIL REGISTRAR-CUM-SUB-Registrar,
ILHAS



**गोवा सरकार**
**सार्वजनिक बांधकाम खाते**
**विभाग–८ (इमारती–दक्षिण),**
**फातोर्डा, मडगाव–गोवा.**

**ई–निविदा सूचना क्र. पीडब्ल्यूडी/डिव्ही–८(बीएस)/एएसडब्ल्यू/२००१/११/२०२५–२०२६ दि. १०–०६–२०२५**
**(फक्त ई–निविदा व ई–भरणा प्रणालीने)**

१. निविदा प्रपत्रे ऑनलाईन सादर करण्याची अंतिम तारीख : **१३/०६/२०२५ सकाळी ९.३० पर्यंत.**

२. निविदा ऑनलाईन उघडण्याची तारीख व वेळ : **१३/०६/२०२५ सकाळी १०.०० नंतर.**

अधिक तपशीलासाठी कार्यकारी अभियंता, काम विभाग–८ (इमारती–दक्षिण), सार्वजनिक बांधकाम खाते, फातोर्डा–मडगाव, गोवा यांच्या कार्यालयाला संपर्क करावा.

संकेतस्थळ : **https://eprocure.goa.gov.in**

डीआय/एडीव्हीटी/६११/२०२५



**Office of the Village Panchayat Colvale, Bardez – Goa**

Ref. No. VP/COL/F/2025-26/ 444 — **TENDER NOTICE** — Date: 04.06.2025

The Sarpanch of V.P. Colvale, Bardez – Goa hereby invites sealed Percentage Rate Tenders from approved and eligible P.W.D Contractors registered in appropriate class and category for the execution of below mentioned work.

| Sr. No. | Name of work | Estimated Amount put to Tender Excluding GST Rs. | EMD in Rs. | Time Limit (excluding monsoons) | Class and category of Contractor — As per New Registration | Cost of Tender Form Rs. In Rs. |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Desilting of road side drains and cutting of bushes from all Nine Wards of V.P. Colvale, Bardez-Goa. | 484033.92 | 9681.00 | 120 days | V & above (RB LD)/BLDG) | 4000 |

**Terms & Conditions:-** **1.** Last date for receiving application is **19/06/2025, upto 1.00 pm** along with cost of tender form (non refundable). **2.** Date of issue of Blank tender form is on **21/06/2025 upto 12.00 Noon.** **3.** Date of receipt of sealed tender is on **24/06/2025 upto 11.00 a.m.** and will be opened in the same day at **12.00 noon.** **4.** Application for issue of tender form shall be accompanied with **a)** Self Attested copy of valid registration certificate of the contractor in the concerned category of work. **b)** Attested copy of PAN Card. **c)** Attested copy of valid GST registration certificate and acknowledgement of up to date return filed with ARN. (Application Reference Number generated on GST common portal) as per GST law. **d)** Declaration of the works in hand shall be submitted with detailed list indicating the present status, on Rs. 100/- stamp paper ( however tender form will not be issued to the person who has works in hand more than four times the tendering limit) **e)** Attested copy of valid Income Tax Clearance Certificate. **5.** EMD shall be in the form of Demand Draft/Deposit Call Receipt (DCR)/Pay Order from Nationalizd or Scheduled Bank drawn in favour of the Sarpanch, V.P. Colvale, payable at Colvale. Sealed in a separate envelope. **6.** Contractor shall submit separate application for each work. Incomplete and third party application shall not be entertained by this Panchayat and no tender form shall be issued. **7.** Unsealed and conditional tenders will be rejected outright. **8.** The contractor shall quote the tender excluding GST & GST as applicable shall be paid separately on total value of work executed. **9.** For the tenders/items of tender in case of being quoted abnormally below i.e. 20% below the estimated cost, than the contractor shall furnish on demand an additional performance security in the form of Bank guarantee from National / Scheduled Bank for that amount which is worked out as difference between quoted amount and reasonable amount reduced by 20%. **10.** Right to accept or reject any or all the tenders without assigning any reasons is reserved with the Village Panchayat.

Seal — **Sd/- Sarpanch, V.P. Colvale, Bardez - Goa.**


## पान १ वरून

### डॉ. कुट्टीकर प्रकरण :
### गोमेकॉतील डॉक्टरांचा संप मागे

डॉक्टरांचा दोन दिवसांचा संप असला तरीही गोमेकॉतील ओपीडी सेवा आणि वॉर्डमधील उपचार सुरळीत सुरू होते. अत्यावश्यक सेवा खंडित होऊ नये म्हणून काही डॉक्टरांनी ड्युटीवर राहून उर्वरितांनी आंदोलनात सहभाग घेतला. त्यामुळे रुग्णांची मर्यादित गैरसोय झाली, पण सेवा पूर्णपणे ठप्प झाल्या नाहीत असे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

मुख्यमंत्री सावंत यांनी डॉक्टरांच्या सर्व मागण्या मान्य करत, तुमचा संयम व सेवाभाव कौतुकास्पद आहे. डॉक्टरांनी समाजाच्या हितासाठी आंदोलन मागे घेतले, त्याबद्दल त्यांचे आभार, असे म्हटले. डॉक्टरांनी संप मागे घेतला असला तरी आंदोलन पूर्णपणे शमलेले नाही. मुख्यमंत्री गोमेकॉमध्ये असतानाच एका डॉक्टरने डीन कार्यालयाबाहेर मंत्र्यांनी जाहीर माफी मागितली आहे, पण आम्हाला बनावट माफी मान्य नाही असा फलक धरून नाराजी व्यक्त केली.

---

### भंगार व्यावसायिकाचे भरदिवसा अपहरण

संदीप हे त्यांच्या कुटुंबाचे प्रमुख आधारस्तंभ असून, अपहरणानंतर कुटुंबावर आभाळच कोसळल्याची भावना शेजाऱ्यांनी व्यक्त केली. सध्या पोलिस या अपहरणामागील नेमकं कारण शोधत असून, व्यावसायिक वैर, कर्जवसुली, किंवा आर्थिक व्यवहारातील वाद आदी शक्यतांचा तपास सुरू आहे. पोलिसांकडून संदीप यांच्या व्यवसायाशी संबंधित व्यक्तींचीही चौकशी सुरू करण्यात आली आहे. फोंडा परिसरात भरदिवसा अशा प्रकारे एखाद्या नागरिकाचे अपहरण होणे ही गंभीर बाब मानली जात असून, स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# बोर्डे पूर्व प्राथमिक विद्यार्थ्यांचे औक्षण

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**डिचोली, दि. १०** : सरकारी प्राथमिक विद्यालय बोर्डे येथील पूर्व प्राथमिक विभागाचा प्रारंभ विद्यार्थ्यांचे औक्षण व पाटी पूजनाने करण्यात आला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ कीर्तनकार रामकृष्ण बुवा अनंत गर्दे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष किरण बोर्डेकर शाळेच्या मुख्याध्यापिका भारती पेडणेकर पालक शिक्षक संघाच्या सभासद अवनी अखिलेश देवधर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुती पाटील यांनी केले पूर्व प्राथमिक विभागाच्या शिक्षिका शिल्पा मशेलकर व अरुणा सावंत यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले. प्राथमिक विभागाच्या बालकांनी पूर्व प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांचे व बालकांचे औक्षण करून स्वागत केले.

# भाईवाडा ते पेठेचावाडा रस्ता वाहतुकीस धोकादायक



भाईड वाडा कोरगाव येथील रस्त्या (छाया निवृत्ती शिरोडकर )

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**पेडणे, दि. १०** : सार्वजनिक बांधकाम खाते हे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत सांभाळत आहे. परंतु गावागावातील रस्त्यांची स्थिती भयानक बनली आहे. याकडे मुख्यमंत्र्यांनी आता स्वतः लक्ष देऊन सार्वजनिक बांधकाम खाते रस्ता विभागाच्या अधिकाऱ्यांना तातडीने दुरुस्ती करण्याच्या सूचना कराव्यात. अशी मागणी मिशन फॉर लोकलचे राजन कोरगावकर यांनी केली.

कोरगाव पंचायत क्षेत्रातील भाईडवाडा ते पेठेचा वाडा कोरगाव पर्यंत जाणारा रस्ता धोकादायक बनला आहे. मागच्या वर्षी या रस्त्याच्या बाजूने भूमिगत वीज केबल घालण्यासाठी रस्त्याचे खोदकाम केले होते .परंतु तो रस्ता व्यवस्थित बुजवला गेला नाही. आणि मे महिन्याच्या शेवटच्याच दोन आठवड्यामध्ये जोरदार पाऊस पडल्यामुळे या रस्त्यावरील खड्ड्यांची रुंदी वाढत गेली आहे. या रस्त्यावरून जास्त करून दुचाकी वाहने चालवताना बरीच कसरत

### ▶ त्वरित उपाययोजना करा
### ▶ नागरिकांची मागणी

करावी लागते. वाहन चालकांचे कंबरने मोडूनही जात आहे .याकडे सरकारने लक्ष देऊन या रस्त्यावर पडलेले खड्डे आणि जे भूमिगत केबल घालत असताना जलवाहिनी टाकताना रस्ते व्यवस्थित बुजवले गेले नाही. त्यावर उपाययोजना करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

राजन कोरगावकर यांनी सांगितले की, हा रस्ता खूप जुना आहे. पंधरा वर्षांपूर्वी या रस्त्याचे डांबरीकरण झाले होते. परंतु त्यानंतर या रस्त्याकडे कोणी ढुंकूनही पाहिले नाही. या रस्त्याच्या बाजूला जलवाहिनी टाकण्यासाठी रस्त्याचे खोदकाम केले होते. ती चर व्यवस्थित बुजवली गेली नाही. परिणामी हा रस्ता धोकादायक ठरत आहे. पालकमंत्री तथा मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी या रस्त्याकडे गांभीर्याने लक्ष देऊन या रस्त्याची दुरुस्ती करून घ्यावी, अशी मागणी यावेळी राजन कोरगावकर यांनी केली आहे.

# कवळे येथे संस्कार वर्गाचे उद्घाटन

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**सावईवेरे, दि. १०** : विवेकानंद केंद्र कन्याकुमारीतर्फे सुरू करण्यात आलेल्या संस्कार वर्गाचे स्थान पूजन कवळे येथील श्री सरस्वती विद्यालयाच्या सभागृहात करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून फोंडा विस्तार संचालक राजेंद्र बर्वे व सरस्वती हायस्कूलचे मुख्याध्यापक सुदेश पारोडकर उपस्थित होते.

राजेंद्र बर्वे म्हणाले की, आपली भारतीय संस्कृती व नितीमूल्ये महान असल्याने भारत देश आज प्रगतीपथावर आहे. शिक्षण हे मुलांना दिले जाते परंतु संस्कार उचलले जातात. त्यामुळे चांगले संस्कार प्रत्येकाने आत्मसात केले पाहिजे. भावी पिढीमध्ये देशप्रेम निर्माण व्हायला पाहिजे. आपल्या देशात सांस्कृतिक मूल्ये महान आहेत परंतु आज आमच्यामध्ये एकत्र येण्याची भावना कमी झालेली आहे. त्यासाठी अशाप्रकारच्या संस्कार वर्गातून आपण एकत्र येतो व समाजात मिसळतो, असे बर्वे यांनी विविध उदाहरण व गोष्टीसहित मुलांना पटवून दिले.

सर्वप्रथम प्रार्थनेने व मनाचे श्लोक म्हणून कार्यक्रमाची सुरुवात झाली.प्रजय वझे यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांची ओळख करून दिली. यानंतर मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने व स्थान पूजन करून संस्कार वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. प्रजय वझे यांनी विवेकानंद केंद्राचा उद्देश स्पष्ट केला. गोवा व महाराष्ट्र मिळून एकूण १५१ ठिकाणी केंद्रातर्फे संस्कार वर्ग सुरू करण्यात आले आहेत. सदर संस्कार वर्ग इयत्ता चौथी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी असून या वर्गात मुलांना खेळ, गाणी, स्तोत्रे, मनाचे श्लोक, गोष्टी, घोषणा, आज्ञा अभ्यास आदी शिकविले जाईल. दर रविवारी सकाळी ९ ते १० यावेळेत वर्ग घेतले जाईल.


युनियन बैंक ऑफ इंडिया — Union Bank of India — A Government of India Undertaking

क्षेत्रीय कार्यालय, २ रा मजला, एलआयसी बिल्डींग, ईडीसी कॉम्प्लेक्स, पाटो, पणजी, गोवा
दूर.क्र. : 0832-2437971/72/73/74 (विस्तार–23)

**वाहनांच्या विक्रीसाठी निविदा सूचना**

युनियन बँक ऑफ इंडियाच्या ताब्यात असलेल्या वाहनांच्या ई–लिलावाद्वारे विक्रीसाठी अर्ज मागवले आहेत. वाहनांचा तपशील खालीलप्रमाणे आहे :

| शाखा नाव व संपर्क क्रमांक : | वाहनाचा तपशील | नोंदणीचा प्रकार | नोंदणी क्रमांक | नोंदणी तारीख | राखीव किंमत (रु.) | ब.र.ठेव (रु.) | खाते क्रमांक | आयएफएससी कोड |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सांतीनेज 9687673604 | एमजी –ग्लॉस्टर डीआ 4x4 6 सीट सावी | खाजगी | जीए–07–एन –3599 | 13.05.2022 | 28,00,000.00 | 2,80,000.00 | 6226019850050000 | यूबीआयएन 0562262 |
| बाणावली 8699737976 | टाटा टिगोर ईव्ही एक्स झेड+ | खाजगी | जीए–08/एए – 3419 | 26.09.2022 | 7,00,000.00 | 70,000.00 | 166321980050000 | यूबीआयएन 0916633 |
| विद्यानगर 9991958012 | मारूती सुझुकी डिझायर व्हीएक्सआय 1.2 एल बीएस व्हीआय | खाजगी | जीए–08/ एए – 7399 | 25.08.2023 | 6,25,000.00 | 62,500.00 | 02792190050000 | यूबीआयएन 0902799 |
| चर्च चौक 9940217618 | आयशर प्रो 3018 एम एचएसडी 22 फूट | कमर्शियल | जीए–05/ 6681 | 13.03.2023 | 14,40,000.00 | 1,44,000.00 | 025921980050000 | यूबीआयएन 0902594 |

**विक्रीच्या अटी व शर्ती** : **(1) सदर लिलाव 26.06.2025 रोजी सकाळी 11.00 वा. जसे आहे जेथे आहे व जे आहे जे काही आहे** या तत्वावर घेतला जाईल. (2) इच्छुक खरेदीदार–बोलीदारांनी **25.06.2025** रोजी संध्या. **5.00** वा त्यापूर्वी एनईएफटी/आरटीजीएस द्वारे वर दिलेल्या खाते क्रमांकांमध्ये एनईएफटी/आरटीजीएस किंवा डिमांड ड्राफ्ट द्वारे बयाणा रक्कम ठेव (ईएमडी) जमा करावी. (3) यशस्वी बोलीदार म्हणून जाहीर झालेल्या व्यक्तीने जमा केलेली ईएमडी वजा करून विक्रीची **100%** रक्कम लिलावाच्या सात दिवसांच्या आत म्हणजे **03.07.2025** रोजी वा त्यापूर्वी जमा करावी. (4) **ई–लिलाव 26.06.2025रोजी सकाळी 11.00 ते संध्या. 5.00** या वेळात **(10 मिनिटांच्या अमर्यादित स्वयंचलित विस्तारासह) https://www.bankeauctions.com** या पोर्टलद्वारे घेतला जाईल. इच्छुक बोलीदारांनी त्यांची नावे **https://www.bankeauctions.com** या संकेतस्थळावर नोंदवणे व मे. सी–वन इंडिया लि. कडून मोफत युजर आयडी व पासवर्ड घेणे आवश्यक आहे. **(संपर्क अधिकारी श्री. भाविक आर. पंड्या मोबा. क्र.–8866682937, हेल्प लाईन क्र. 729198112425/26,** ईमेल : **Maharashtra@c1india.com ). (5)** त्यासाठी कोणतेही कारण न देता लिलाव रद्द करण्याचा किंवा सर्वोच्च बोली न स्वीकारण्याचा अधिकार बँकेने राखून ठेवला आहे. (6) त्यापुढील बोली अगोदरच्या बोली पेक्षा किंवा सर्व वाहनांसाठी ठरवलेल्या राखीव किमतीपेक्षा रु. **5,000/-** हून कमी नसावी. (7) वाहन विक्री किंमतीची रक्कम भरल्यावर/जमा केल्याची खात्री झाल्यानंतर जसे आहे जेथे आहे या स्थितीत त्या वाहनाची डिलीव्हरी दिली जाईल. (8) अयशस्वी बोलीदार ज्यांनी ईएमडी जमा केली आहे ते विक्री संमत झाल्यावर व्याजाशिवाय सदर जमा रक्कम परत मिळण्यास पात्र राहतील. (9) तारण ठेवलेल्या वाहनातील कोणत्याही त्रुटीसाठी बँक जबाबदार राहणार नाही वा त्यांचे दायित्व असणार नाही.(10) देय रस्ता कर/पॅसेंजर कर इ. याची माहिती बोलीदारांनी आरटीओ कडून घ्यावी व लिलावात भाग घेण्यापूर्वी देय पार्किंग चार्जेसचा भरणा करावा. आरटीओ/विमा कंपनी/कोणतेही अन्य प्राधिकरण यांना कोणतेही देय असल्यास त्यांचा खर्च बोलीदारास सोसावा लागेल. (11) बोली रकमेची उर्वरित रक्कम **03.07.2025** रोजी वा त्यापूर्वी जमा करण्यास यशस्वी बोलीदारास अपयश आल्यास त्याने जमा केलेली ईएमडी बँकेद्वारे जप्त केली जाईल व स्वीकारलेली बोली स्वयंचलितपणे रद्द होईल. (12) बोलीदारांस, त्यांची इच्छा असल्यास, ते पूर्ववेळ घेऊन आठवड्यातील कामाच्या दिवशी विकावयाच्या जंगम मालमत्तांची पाहणी करू शकतील.

**दिनांक : 11.06.2025**
**ठिकाण : पणजी, गोवा**

**सही/–**
**प्राधिकृत अधिकारी**
**युनियन बँक ऑफ इंडिया**


# युवा चेतना संघाचे उन्हाळी शिबिर उत्साहात

■ *टीम दैनिक हेराल्ड*

**साखळी, दि. १०** : केरी–सत्तरी येथील युवा चेतना संघाच्या वतीने केरी गावात आयोजित करण्यात आलेले पाच दिवशीय उन्हाळी शिबीर घोटेली नं. २ येथील श्री सातेरी देवस्थानात उत्साहात झाले.यात विविध स्पर्धा, खेळ आणि कला शिकविण्यात आल्या.

उदघाटन कार्यक्रमाला केरीच्या सरपंच सुप्रिया गावस, स्थानिक पंचसदस्य राजेश गावस,देवस्थानचे बाबली गावस युवा चेतना संघाच्या अध्यक्षा रेश्मी म्हालकर तर समारोपीय कार्यक्रमाला देवस्थान समितीचे बाबली गावस आणि गौरव गावस, युवा चेतना संघाच्या अध्यक्षा रेश्मी म्हालकर उपस्थित होते. मान्यवरांनी यावेळी मार्गदर्शन केले.

यावेळी शिबिरात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या प्रणीत घाडी (स्टोन पेंटिंग),जयदेव शेटकर(चित्रकला स्पर्धा), तसेच क्रियाकलाप मधील




साखळी : उन्हाळी शिबिराच्या उद्‌घाटनप्रसंगी सरपंच सुप्रिया गावस, राजेश गावस, बाबली गावस व आयोजक.

मधुकर,श्रेषा गावस ,जयदेव शेटकर, चैतन्य माजिक, श्राव्या गावस यांना पारितोषिके देण्यात आली. त्याचप्रमाणे श्राव्या गावस (संगीत खुर्ची), जयदेव शेटकर (उत्कृष्ट शिबिरार्थी मुलगा), श्राव्या गावस (उत्कृष्ट शिबिरार्थी मुलगी), रियाना माजिक (सक्रिय विद्यार्थी) यांना गौरविण्यात आले.कार्यक्रमात काही विद्यार्थ्यांनी आपल्या कला सादर करून उपस्थितांचे मने जिंकली.शिबिरात श्रुती गावस यांनी स्टोन पेंटिंग, दिव्या गावस यांनी नाट्यकला,रामकृष्ण गावस यांनी जादूचे खेळ,समीक्षा गावस यांनी झुंबा नृत्य शिकविले.

शिबिरात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना यावेळी प्रमाणपत्रे वितरित करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रांजल गावस यांनी केले तर रेश्मी म्हालकर यांनी आभार मानले.

अर्जुन केसरकर, स्पर्श परेश गावस, चैतन्य माजिक, निर्वी मिशाळ, तुकाराम गावस, साईश्मा गावस, जयदेव शेटकर, वंश गावस, शार्वी पंकज सावंत, प्राची, श्रीशा गावस, श्राव्या गावस, प्रणित घाडी, मिहीर गावस, पलक गावस, पुनीत गावस, श्रावल्या गावस, मंथन गावडे, महेंद्र गावडे, शांताराम राऊळ, गोपाळ गावस, गौरक्षा गावस, मयूर राणे यांनी भाग घेतला.